# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०१/०६/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. मौदा:— अंतर्गत केसलापुर येथे दिनांक ३१/०५/२०२२ चे ०९.२५ वा. दरम्यान मौदा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच. —३४/ जी—७३४९ क्रमांकाच्या आयसर ट्रकला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी क्र. आयुष बारू शेख वय ४१ वर्ष रा. कपिल नगर नागपुर, २) शिवम दिलीप भारती वय १८ वर्ष रा. भिलाई सेक्टर ३, सिरसा ता. धमदा जि. दुर्ग ३) गोकुळदास शिवेंद्र दहरिया वय २० वर्ष रा. भिलाई सेक्टर ३, सिरसा ता. धमदा, जि. दुर्ग यांच्या ताब्यातुन ३०(गोवंश) जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती १६,५०,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. तुषार कुडुपले, पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११(१)ड प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ५(अ),९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री सतिश सोनेकर मो.क्र. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन मौदाचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री हमेंतकुमार खराबे यांचे नेतृत्वात सपोनि सतिश सोनेकर, पोना संजय बरोदिया, तुषार कुडुपले व पोशि केशव फड यांनी यशस्वीरित्या पार पाडली.







पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर